**प्रेसनोट** **दिनांक ०२/०९/२०२३**

## जर्मन नागरीकांची फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून दिलेबाबत

फिर्यादी नामे श्री. सोरेन ऑलरेच हबरमन (जर्मन नागरिक), वय २४ वर्ष, हा दक्षिण आशिया फिरण्यासाठी आले असता ते जयपूर येथे असताना तेथील तीन स्थानिक नागरिकांनी सोरेन यास ते ज्वेलरी मधील खड्यांचा व्यवसाय करत असून यामध्ये त्यांना भरपूर नफा मिळतो असे सांगून त्या लोकांनी सोरेन यास २०००/- रु किमतीचे बनावट खडे वापरलेल्या अंगठ्या व ब्रेसलेट १५ लाख रुपयांना विकले व ते सोरेन याच्या जर्मनी येथील पत्यावर पाठवून दिले आणि त्यानंतर एक दिवसांनी ते सोरेन याच्याकडे त्या विकलेल्या साहित्याचे पैसे मागू लागले. सोरेन याने दिल्ली येथील एटीएम मधून पैसे काढण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला असता ते त्यास न जमल्याने ते सर्वजण विमानाने मुंबई येथे हॉटेल मिलन इंटरनॅशनल, सांताक्रुज पश्चिम, मुंबई येथे राहावयास आले व दिनांक १९ ऑगस्ट ते दिनांक २४ ऑगस्ट या कालावधीमध्ये सोरेन याचे एटीएम मधून सुमारे ३,७५,०००/- रुपये रोख व वामन हरी पेठे ज्वेलर्स या दुकानामधून ६,२०,०००/- रुपये किं. चे सोन्याचे १०० ग्रॅम वजनाचे २ बिस्किटे असे एकूण ९,७५,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल सोरेन याचेकडून घेतला. या दरम्यान सदर इसमांनी त्यांची बनावट दागिणे देवून फसवणूक केली आहे असे त्यांचे लक्षात आले म्हणून त्यांनी दिलेल्या तक्रारी वरुन दिनांक २५/०८/२३ रोजी सांताक्रुज पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६८१/२०२३ कलम ४०६,४२० भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर फिर्यादी व आरोपी राहत असलेल्या हॉटेल मध्ये पोलीसांनी तात्काळ जावून तपास केला. सदरचा गुन्हा हा आरोपी १) झाकीर हुसेन व त्यांचे दोन साथीदारांनी केला असल्याचे निष्पन्न झालेने आरोपी १) झाकीर हुसेन यास अटक करण्यात आली असून त्याचेकडून फसवणूक झालेल्या मालमत्ते पैकी ९,७०,०००/- रू. किं चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू असून इतर दोन आरोपीचा शोध सुरू आहे.

गुन्हयाचे तपासात हस्तगत करण्यात आलेली मालमत्ता मा. न्यायालयाचे आदेशान्वये दिनांक ०२/०९/२३ रोजी फिर्यादी श्री . सोरेन ऑलरेच हबरमन यांना सुपुर्त करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सांताक्रूझ पोलीस ठाणे श्री राजेंद्र काणे, पोलीस निरिक्षक श्री. उन्मेश थिटे , पोउपनि श्री. राहुल कोकाटे, पोउनि श्री. शिवकुमार जाधव व मपोउनि.श्रीमती रीना लोहार यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

--------oo-------